# ॲग्रोव्हिजनच्या दशकपूर्तीला पंतप्रधान येणार

## कृषिमंत्र्यांसह चार राज्यांचे मुख्यमंत्री अतिथी


## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची पत्रपरिषदेत माहिती

लोकशाही वार्ता/नागपूर

येत्या २३ ते २६ नोव्हेंबरदरम्यान आयोजित ॲग्रोव्हिजनच्या दशकपूर्ती कृषी प्रदर्शनाच्या उद्‌घाटन सोहळ्याला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उपस्थिती राहणार आहे. यंदा भव्यदिव्य स्वरुपात होणाऱ्या सोहळ्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह पूर्वेकडील राज्याचे मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक तथा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पत्रपरिषदेत दिली.

विदर्भातील शेतकऱ्यांना शिक्षित, माहित व सबल करण्यासाठी हे कृषी प्रदर्शन भरविण्यात येते. कार्यशाळा, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट अध्याधुनिक तंत्रज्ञान सादरीकरणाची दालने, कृषीविषयक ताज्या विषयावरील चर्चासत्रे, विदर्भाच्या शेतीला नवी दिशा देणाऱ्या परिषदांसह पशूप्रदर्शन, ॲग्रीथॉन हे या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य राहणार आहे. बळीराजाच्या गौरवाचा ॲग्रोव्हिजन अवॉर्ड सोहळा हे यंदाचे खास वैशिष्ट्य आहे.





दशकपूर्तीनिमित्त शेतीत उल्लेखनीय कार्य व योगदान देणाऱ्या शेकऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. सन्मानपत्र व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप राहील. तज्ज्ञांच्या निवड समितीमार्फत पुरस्कार विजेत्यांची निवड करण्यात येईल, असेही गडकरी यांनी सांगितले.

## कृषिमंथन स्पर्धेचे आयोजन

विदर्भातील विद्यार्थ्यांचा शेती व संलग्न क्षेत्रांकडे कल वाढावा, त्यांनी शेती संबंधित क्षेत्रात करिअर घडवून शेतकरी विकासाला हातभार लावावा, यासाठी दशकपूर्तीच्या निमित्ताने ॲग्रोव्हिजनमार्फत विद्यार्थ्यांसाठी कृषिमंथन स्पर्धा होणार आहे. निंबध, भित्तीपत्रक सादरीकरण, इनोव्हेशन्स आणि स्टार्टअपची राष्ट्रीय कृषी प्रदर्शनात मांडणी या तीन प्रमुख बाबींचा समावेश राहणार आहे.